पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/३/कावि/९९७/२०२०
दिनांक - ०१/१०/२०२०

प्रति,

मा..........................................,
सदस्य, स्थायी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा दिनांक **०७/१०/२०२०** रोजी आयोजित केले बाबत....

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा बुधवार, दिनांक **०७/१०/२०२०** रोजी **दु.०२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आलेली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण ऑनलाईन पध्दतीने सहभागी व्हावे, ही विनंती.

आपला विश्वासू,



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत- १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १९२**

**दिनांक - ०७/१०/२०२०** **वेळ – दुपारी ०२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा बुधवार, दिनांक **०७/१०/२०२०** रोजी दुपारी **०२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात ऑनलाईन पध्दतीने **(VIDEO CONFERENCING)** द्वारे आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातही कोवीड १९ या विषाणु मुळे रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याचे निदर्शनास येत आहे. कोवीड १९ या आजारास जागतिक आरोग्य संघटनेने महामारी घोषित केलेले आहे. मनपा स्तरावर कोवीड १९ या विषाणुचे नियंत्रण व प्रतिबंध करणेकामी कार्यवाही चालु आहे. कोवीड १९ च्या संसर्गजन्य रोगावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेकामी वैद्यकीय विभागाकडील अंदाजपत्रकातील खालील लेखाशिर्षावर तरतुद अपुरी असुन इतर लेखा शिर्षातुन तरतुद वर्ग करावी लागणार आहे. तरतुद वर्गीकरणाबाबत मा.अति. आयुक्त (१) यांचे समवेत दि.१९/०५/२०२० रोजी आढावा बैठक झालेली आहे.

१. **अस्थायी आस्थापना लेखाशिर्ष:-** वैद्यकीय विभागांतर्गत कोवीड विषाणुवर नियंत्रण व प्रतिबंध करणेकामी विविध रुग्णालये व दवाखान्यांकरिता दरमहा एकत्रीत मानधनावर वैद्यकीय अधिकारी व पॅरामेडीकल स्टाफ भरण्याची प्रक्रिया चालु आहे. त्याकरिता अस्थायी आस्थापना या लेखाशिर्षावर जास्त तरतुद आवश्यक आहे.

२. **ठेकेदार पध्दतीने वायसीएमएच व इतर रुग्णांलयांची साफसफाई:-** वैद्यकीय विभागांतर्गत कोवीड बाधीत रुग्णांवर नविन भोसरी रुग्णालय येथे उपचार चालु आहेत. तसेच मोशी व बालेवाडी येथे कोवीड केअर सेंटर, आकुर्डी कोविड केअर सेंटर सद्यस्थितीत कार्यरत आहेत. कोवीड रुग्णसंख्या वाढत असल्याने कोविड केअर सेंटर व रुग्णालयांची संख्या वाढवावी लागणार आहे. तसेच रुबी एल केअर कोविड केअर सेंटरची उभारणी केली जात आहे. सदर ठिकाणी साफसफाई करणे आवश्यक आहे.

३.**जैव वैद्यकीय घनकचरा विल्हेवाट लावणे**:- वैद्यकीय विभागांतर्गत रुग्णालये/दवाखाने येथे कोवीड १९ विषाणुचे रुग्णांमुळे जैव वैद्यकीय घनकच-या मध्ये वाढ झालेली आहे. सदर घनकच-याची त्वरीत विल्हेवाट लावणे आवश्यक आहे.

४.**वीजबिले:-** वैद्यकीय विभागांतर्गत रुग्णालये/दवाखाने तसेच कोवीड केअर सेंटर येथील वीज बिलातही वाढ झालेली आहे.

५.**महात्मा फुले जीवनदायी आरोग्य योजना:-** वैद्यकीय विभागांतर्गत रुग्णालये/दवाखाने तसेच कोवीड केअर सेंटर मधील कोवीड १९ चे संसर्ग बाधीत रुग्ण, विलगीकरण व अलगीकरण कक्षामध्ये ठेवण्यात येणा-या रुग्णांना जेवणाची सोय करण्यात आलेली आहे. त्यासाठी जास्त खर्च अपेक्षीत आहे.

६. **वाहन इंधन कार्यालय:-** वैद्यकीय विभागांतर्गत रुग्णालये/दवाखाने तसेच कोवीड केअर सेंटर मध्ये रुग्णांना ने-आण करणेकरीता, तसेच राहते घर व मनपा रुग्णांलय अथवा कोवीड केअर सेंटर व इतर ठिकाणी उपचारासाठी ने-आण करणे आवश्यक आहे. त्याकरिता मा. जिल्हाधिकारी पुणे यांनी रुग्णवाहिका उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. तसेच कोवीड विषाणुचा प्रार्दुभाव वाढल्यास अजुन वाहनांची आवश्यकता भासणार आहे. त्याकरिता जास्त वाहन इंधन खर्च अपेक्षीत आहे.

७. **खाजगी वाहन भाडे:-** मनपा क्षेत्रातील बेघर, गरीब, निराधार, गरजु नागरीक / विद्यार्थ्यांना जेवणाची सोय व शिधा वाटप करणेकामी वाहन दुरुस्ती कार्यशाळा मार्फत वाहने भाडेतत्वावर घेणेत आलेली आहेत. फिल्ड सर्व्हिलन्स टिम करीता ५० वाहने र.रु.३३००/- या दराने घेणेत आली असुन त्याचा अंदाजे ६ महिन्यांकरीता र.रु.२,९७,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. तसेच उपलब्ध करुन देण्यात आलेल्या भाडेतत्वावरील रुग्णवाहिका इ. वाहनांचा खर्च वैद्यकीय विभागातील खाजगी वाहन भाडे या लेखाशिर्षातुन करणेत येत आहे. सदर लेखाशिर्षामधील तरतुदीत वाढ करणे अपेक्षीत आहे.

८. **हेल्थ स्मार्ट कार्ड योजना:-** वैद्यकीय विभागांतर्गत रुग्णालये/दवाखाने येथे हेल्थ स्मार्ट कार्ड योजना कार्यान्वित केलेली आहे. त्याकरिताही जास्त खर्च अपेक्षीत आहे.

९. **शासकिय योजनांची अंमलबजावणी:-** तसेच कोविड विषाणुवर नियंत्रण व प्रतिबंध करणेकामी शासनाकडील योजनांची अंमलबजावणी करणेकामी खर्च अपेक्षित आहे. त्याकरीता शासकिय योजनांची अंमजबजावणी या लेखाशिर्षावर तरतुद कमी पडत आहे.

उपरोक्त क्र.१ ते १० चे बाबींवर लेखा विभागाकडील परिपत्रक क्र.लेखा/१/कावि/३४८/२० दि.११/५/२०२० चे अनुषंगाने मा.अति.आयुक्त (१) यांचे दालनात दि.१९/५/२०२० रोजी कामकाज आढावा बैठक होऊन खाली नमुद केलेल्या लेखाशिर्षांवर तरतुद वाढ करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

| अ.क्र | लेखाशिर्ष | मुळ तरतुद | घट | वाढ |
|---|---|---|---|---|
| १ | स्थायी आस्थापना | **58,00,00,000** | 25,20,00,000 | |
| २ | अस्थायी आस्थापना | 7,50,00,000 | - | 5,30,00,000 |
| ३ | ठेकेदार पध्दतीने वायसीएमएच व इतर रुग्णांल यांची साफसफाई | 6,50,00,000 | - | 4,50,00,000 |
| ४ | जैव वैद्यकीय घनकचरा विल्हेवाट लावणे | 5,00,00,000 | - | 1,50,00,000 |
| ५ | वीजबिले | 1,25,00,000 | - | 1,00,00,000 |
| ६. | महात्मा फुले जीवनदायी आरोग्य योजना | 30,62,500 | - | 20,00,000 |
| ७. | वाहन इंधन कार्यालय | 6,32,500 | - | 35,00,000 |
| ८. | खाजगी वाहन भाडे | 71,50,000 | - | 8,50,00,000 |
| ९. | हेल्थ स्मार्ट कार्ड योजना | 2,00,00,000 | - | 1,35,00,000 |
| १०. | शासकिय योजनांची अंमलबजावणी | 1,00,00,000 | - | 2,50,00,000 |
| | एकुण | | - | 25,20,00,000 |

तरी, उपरोक्त बाबींचा विचार करता वरील अनु.क्र १ ते १० या लेखाशिर्षांवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०३ अनुसुचि ड मधील प्रकरण ७ तरतुद २(१) नुसार वाढ/घट करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दि.०७/१०/२०२० चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्र.२) भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम १८९७, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५, महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम ६३(६) व कलम ६७(३) (क) नुसार कोरोना विषाणुचा (Covid-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक आपत्तकालीनपरिस्थिती व कोरोनाच्या अटकावासाठी साथरोगाची आपत्तीजनक स्थितीचा सामना करणेकामी M/s.S.D.Biosensor Healthcare Pvt. Ltd., Haryana यांचेकडून शासन निर्णयाच्या

अनुषंगाने Standard Q Covid-19 Ag detection Kit – 4000 Kits, 25 Test per Kit (1,00,000 Tests) 12% GST सह म्हणजे प्रति टेस्ट र.रु.४५०/- प्रमाणे अधिक १२% GST र.रु.५४/- असा १ टेस्टकरीता र.रु.५०४/- प्रमाणे थेट पध्दतीने 1,00,000 Tests खरेदी करणेकामी येणा-या एकुण र.रु.५,०४,००,०००/- (अक्षरी र.रु.पाच कोटी चार लाख फक्त) चे खर्चास तातडीक बाब असलेने M/s.SD Biosensosr Healthcare Pvt. Ltd., Haryana यांचेकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड प्रकरण क्रमांक ५(२)(२) नुसार करारनामा न करता ५% अनामत रक्कम घेवून थेट पध्दतीने खरेदी करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दि.०७/१०/२०२० चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्र.३) मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्र.10/01/2019-20 अन्वये "जलशुद्धीकरण केंद्र, से.क्र.२३, येथील विविध युनिट्स ची स्ट्रक्चरल ऑडीट च्या अहवालानुसार देखभाल दुरुस्ती करणे, टप्पा क्र.१ च्या शुध्द पाण्याच्या टाकीला नवीन छताची उभारणी करणे व तदनुषंगिक कामे करणेकामी मे.मंगलदास इंफ्राटेक प्रा.लि. नि.र.रू.3,49,68,595/- (अक्षरी र.रू.तीन कोटी एकोणपन्नास लाख अडूशष्ठ हजार पाचशे पंच्याण्णव फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.3,47,42,147/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.3,47,42,147/- पेक्षा 3.15% जास्त म्हणजेच र.रु.3,58,36,525/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.1,28,648/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.97,800/- = एकुण र.रु.3,60,62,973/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.४) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाय.सी.एम.रुग्णालयातील व नविन आय.सी.यु. विभागाकरीता व नवीन भोसरी रुग्णालयातील आय.सी.यु. करीता आवश्यक असलेली १७ नग व्हेंटीलेटर खरेदी करणेकामी मा.स्थायी समिती ठराव क्रमांक-५२०६, दि.१४/०८/२०१९ अन्वये मान्यता दिलेनुसार M/s.Yucca Diagnostics यांचेशी करारनामा करुन पुरवठा आदेश देणेत आला होता. तथापि M/s.Yucca Diagnostics यांनी पुरवठा आदेशानुसार पुरवठा केलेल्या मशिन्स ई-निविदेतील नमुद स्पेशिफिकेशनप्रमाणे योग्य नसल्याने व त्यांनी करारनाम्यातील अटींचा भंग केल्याने त्यांचा पुरवठा आदेश रद्द करण्यात आलेला आहे. त्यानुसार त्यांचेशी करण्यात आलेला

दि.०५/०९/२०१९ रोजीचा करारनामा रद्द करणेस मा.स्थायी समिती सभेची मान्यता व वस्तू खरेदी समितीने दिलेल्या निर्णयास अधिन राहुन ई-निविदेतील L2 निविदाधारक मे.प्राईम सर्जिकल अण्ड फार्मा यांनी प्रति नग र.रु.१५,५०,०००/- प्रमाणे व्हेंटीलेर पुरवठयाकामी सहमती दर्शविल्याने त्यांना १७ नग व्हेंटीलेटरचा पुरवठा आदेश देणेत आला होता. सदर पुरवठा आदेशानुसार व ई-निविदेतील विहीत स्पेशिफिकेशननुसार त्यांनी व्हेंटीलेटरीचा पुरवठा केलेला असून त्यांनी पुरवठा केलेले व्हेंटीलेटर हे ई-निविदेतील स्पेशिफिकेशननुसार असल्याबाबतचा वाय.सी.एम. रुग्णालयाकडील गठीत केलेल्या तज्ञ समितीचे अहवालानुसार अधिष्ठाता, PGI, YCMH यांनी दिनांक २४/०९/२०२० रोजी अहवाल सादर केलेला आहे व त्यानुसार मे.प्राईम सर्जिकल अण्ड फार्मा यांचेकडून प्राप्त झालेल्या प्रति नग र.रु.१५,५०,०००/- या लघुत्तम दरानुसार खरेदी करणेकामी येणा-या र.रु.२,६३,५०,०००/- चे खर्चास महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) व ७३(क) नुसार कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे..

विषय क्र.५) शासन निर्णय नगर विकास विभागाकडील क्र.स्वअम २०१५/प्र.क्र.२३/नवि ३४ दिनांक १५ मे २०१५ नुसार संपुर्ण राज्यामध्ये मिशन मोड पध्दतीने अभियान सुरु करण्यात आलेले आहे. या अभियानाअंतर्गत सर्व शहरे हागणदारी मुक्त करणे व घनकचरा व्यवस्थापनांतर्गत स्वच्छ करणे या दोन मुख्य बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे. स्वच्छ भारत अभियान कार्यक्रमा अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्वच्छ सर्वेक्षण २०२१ ची अंमलबजावणी करीत आहे त्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड शहराची कचरामुक्त शहर स्टार रेंटींग जाहिर करणे आवश्यक आहे. स्वच्छ सर्वेक्षण २०२१ अंतर्गत पिंपरी चिंचवड शहरास पाच तारांकित नामांकन(5 स्टार रॅंकीग) कचरा मुक्त शहर (गारबेज फ्री सिटी) करीता केंद्र शासनाने तयार केलेल्या नियमावली, मार्गदर्शक सुचना व कार्यपध्दतीनुसार उपाययोजना करीत आहे. पिंपरी चिंचवड शहरातील घरोघरी कचरा संकलन करणे, घरोघरी कच-याचे वर्गीकरण करणे, कच-याची वाहतूक करणे व प्रक्रिया करणे करीता केलेली व्यवस्था, गटर, नाले व सार्वजनिक स्वच्छता, स्वच्छता ॲपचा वापर, प्लास्टिक बंदी कार्यवाही तसेच ५०० टीपीडी चे मॅकेनिकल कंपोस्ट प्लॉन्ट, ३० टीपीडी वर्मी कंपोस्ट प्लॉन्ट, ५ टीपीडी प्लास्टीक टू फयुअल ची व्यवस्था केलेली आहे. याबाबत जनतेकडुन हरकती व सूचना १५ दिवसांच्या कालावधीत मागवुन घेऊन प्राप्त हरकती व सूचनांची पडताळणी करुन घेऊन मानंकाबाबत समाधान असल्याचा प्रस्ताव शासनास सादर करेल व मानांकनासाठी शासनाने दिलेल्या स्वयंघोषणा करावयाची आहे. सबब, पिंपरी चिंचवड शहर पाच तारांकित नामांकन (5 स्टार रॅंकीग) साठी शासनाने नमुद केलेले सर्व नियम पुर्ण करीत आहे. त्यामुळे पिंपरी चिंचवड शहर स्वच्छ सर्वेक्षण २०२१ अंतर्गत

पाच तारांकीत नामांकन (5 स्टार रँकीग) कचरा मुक्त शहर म्हणुन मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्र.६) महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पो.लिमिटेड यांनी मनपा मालकीच्या जागा मागणी केलेनुसार प्रस्तुत प्रकल्पाकरीता दि,०८/०२/२०२० च्या मागणीपत्रान्वये मेट्रो स्टेशन विद्युतीकरणासाठी रोहित्र आणि आर.एम.यु. संच मांडणी साठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका आवारातील विद्युत डी.पी. बांधणीच्या बाजूची जागा सदर संच उभारणीसाठी उपलब्ध करून देणेबाबत कळविले आहे. महामेट्रो यांचे प्रतिनिधी यांनी प्रत्यक्ष जागेवर सुचविले नुसार जागेचे मोजमाप व क्षेत्रफळ ४.५० मी. x ४.०० मी.= १८ चौ.मी. इतके आहे. तसेच यापूर्वी मा.आयुक्त सो.यांचेकडील आदेश क्र.भुजि/०२/कावि/३०२/२०१८ दि.२६/१०/२०१८ अन्वये सर्व्हे नं.१७७ मौजे पिंपरी (वल्लभनगर) येथील पिंपरी चिंचवड मनपा विकास योजना आराखड्यानुसार आरक्षण क्र.५३ मधील क्षेत्र ८००० चौ.मी.पैकी २१७६.३० चौ.मी.जागा मा.उपसंचालक नगररचना यांचेकडून निश्चित करण्यात येणा-या भाडे दरानुसार व मा.महापालिकासभेची मान्यता मिळेल या उमेद मान्यतेस अधिन राहून आगाऊ ताबा देण्यात आलेला असल्याने मा.महासभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. सदर दोन्ही जागांचा तपशील खालील प्रमाणे.

| अ.क्र. | स.नं. / सि.स.नं. | क्षेत्र | एकूण चौ.फुट | ठिकाण | नगररचना विभागाकडील ३० वर्षे कालावधीचा भाडे दर प्र.चौ.फुट (एकूण भाडे ) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | स.नं.१५४, सि.स.नं. ५७६० | १८ चौ.मी. | १९४ चौ.फुट | पि.चि.मनपा आवार, पिंपरी | र.रु.१८७७/-एकूण भाडे र.रु.३,६४,१३८/- | |
| २ | सर्व्हे नं.१७७ | २१७६.३० चौ.मी. | २३४२५चौ.फुट | मौजे पिंपरी (वल्लभनगर) | र.रु.१२६५/- एकूण भाडे र.रु.२,९६,३२,६२५/- | जागेचा आगाऊ ताबा देणेत आला आहे. |

उपरोक्त तक्त्यात नमूद केलेप्रमाणे प्रस्तुत प्रकल्पाकरीता पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील द्यावयाचे जागेचे एकूण क्षेत्र २३,६१९ चौ.फुट इतके होत आहे. त्यानुसार सदर

कामी मनपाचे नगररचना विभागाने ठरविलेले भाडे दराप्रमाणे होणारी एकूण भाडे र.रु.२,९९,९६,७६३/- इतकी होत आहे. प्रस्तुत प्रकल्पामध्ये एक्झीक्युटीव्ह डायरेक्टर , महा मेट्रो रेल कार्पोरेशन लिमिटेड, पुणे मेट्रो रेल प्रकल्प यांचे महामेट्रो/PMRP/ २०१७/३८४/ दि.२८/०९/२०१७ चे पत्रात नमूद केले प्रमाणे पिंपरी चिंचवड मनपाचा एकुण आर्थिक हिस्सा २८७.७० कोटी इतका असणार आहे. त्यापैकी जागांबाबतचा हिस्सा रक्कम रुपये १८२.६० कोटी इतका असणार आहे.उपरोक्त बाबींचा विचार करता पुणे मेट्रो रेल प्रकल्पाकरीता महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लिमिटेड यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ (क) अन्वये सदर तक्त्यामध्ये नमुद केलेप्रमाणे मनपा हद्दीतील जागा ३० वर्षे कालावधीसाठी नियमाप्रमाणे महानगरपालिकेच्या आर्थिक हिस्स्या पोटी देणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्र.७) पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सन २०२०-२१ चे अंदाजपत्रकात पीएमपीएमएल निधी या लेखाशिर्षावर र.रु.२४४ कोटी (अक्षरी र.रु.दोनशे चव्वेचाळीस कोटी फक्त) तरतूद करणेत आली असून यामध्ये संचलनतूट १३३.५८ कोटी विविध प्रकारचे पासेस र.रु.१४.५९ कोटी बसेस खरेदी र.रु.३५.८३ कोटी व ई बस सबसिडी ६० कोटी असा अपेक्षीत खर्च गृहीत धरण्यात आलेला आहे. सदर रकमेतून रक्कम रुपये ९ कोटी संचलनतूट व सवलतीचे पासेसपोटी र.रु.१.२३ लाख असे र.रु.१०.२३ कोटी (अक्षरी र.रु.दहा कोटी तेवीस लाख फक्त) सन २०१९-२० च्या अंदाजित संचलन तूटीचे लेखापरिक्षण होऊन तूट कायम होईपर्यंत माहे ऑक्टोंबर २०२० चे अदा करावयाचे असल्याने व सदरची बाब आर्थिक स्वरुपाची असल्याने त्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.८) मनपाच्या विद्युत विभागाकडील (निविदा क्र.६/०१-२०२०-२१) अन्वये मे.फ्लॅग & पोल्स नि.र.रू.३३,५३,७९०/- (अक्षरी र.रू.तेहतीस लाख त्रेपन्न हजार सातशे नव्वद फक्त) पेक्षा २३.४०% कमी या ठेकेदाराकडुन काम करून घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.९) मनपाच्या स्थापत्य मुख्यालयामार्फत पिपंरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत करण्यात येणारे रस्ते, पावसाळी पाण्यासाठी वाहिनी व इतर स्थापत्य विषयक कामे, पूल, स्काय वॉक व इमारती यांचे कामाकरिता नि.नो.क्र.२२/१/२०१७-१८ अन्वये Expression of Interest ची निविदा प्रसिध्द करणेत आली होती, त्यास अनुसरुन टप्पा - १ मध्ये प्रपत्र- अ (रस्ते, पावसाळी पाण्यासाठीची वाहिनी व इतर स्थापत्य विषयक कामे – २५ सल्लागार) व प्रपत्र- ब (पूल,स्काय वॉक व इमारती – २४ सल्लागार) यांना सहभागी

करून घेणेत आलेले आहे. टप्पा- २ मध्ये मे.नेक्सस टेकनो कन्सलटंट यांनी विनंती अर्जासोबत सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी करणेत आली. मे. नेक्सस टेकनो कन्सलटंट यांना नव्याने नियुक्त करणेकामी त्यांच्या कामाच्या वर्गवारी प्रमाणे प्रपत्र- अ-सल्लागार श्रेणी -२ (रस्ते, पावसाळी पाण्यासाठीची वाहिनी व इतर स्थापत्य विषयक ५ ते २० कोटी मधील कामे) या प्रमाणे प्रपत्र अ तयार करण्यात आले आहे. टप्पा-२ मधील प्रपत्र अ मे. नेक्सस टेकनो कन्सलटंट यांना पॅनलवर घेणे साठी मान्यता देणे बाबत विचार करणे.

विषय क्र.१०) मनपाचे वृक्षसंवर्धन विभागाकडील निविदा नोटीस क्र.२/२०१९-२० मधील बाब क्र.१ अन्वये अ क्षेत्रिय कार्यालयातील रस्ते मध्य दुभाजक सुशोभिकरण देखभाल करणे कामी मे.तावरे फॅसिलिटी मॅनेजमेंन्ट सर्व्हिसेस प्रा. लि. निविदा र.रू.६४,३७,३०४/- (अक्षरी र.रू.चौसष्ट लाख सदोतीस हजार तीनशे चार फक्त) पेक्षा -३३.०३% या कमी दराची निविदा मंजुर दराने २ वर्ष कालावधीसाठी येणारा खर्च र.रु.४३,११,०६२/-(अक्षरी र.रु.त्रेचाळीस लाख अकरा हजार बासष्ट फक्त) प्रमाणे स्विकृत करुन निविदेतील नियम अटी/शर्तीस अधिन राहुन करारनामा करुन काम करुन घेणेस व प्रत्यक्ष येणारे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.११) मनपाचे वृक्षसंवर्धन विभागाकडील निविदा नोटीस क्र.२/२०१९-२० मधील बाब क्र.२ अन्वये ब क्षेत्रिय कार्यालयातील रस्ते मध्य दुभाजक सुशोभिकरण देखभाल करणेकामी मे.कोमल स्वयं.सेवा सह.संस्था. निविदा र.रू.४१,७३,८६४/- (अक्षरी र.रू. एक्केचाळीस लाख त्र्याहत्तर हजार आठशे चौसष्ट फक्त) पेक्षा (-३३.०३%) कमी L1 च्या दराची निविदा मंजुर दराने २ वर्ष कालावधीसाठी येणारा खर्च र.रु.२७,९५,२३७/- (अक्षरी र.रु.सत्तावीस लाख पंच्यानव हजार दोनशे सदोतीस फक्त) प्रमाणे स्विकृत करुन निविदेतील नियम अटी/शर्तीस अधिन राहुन करारनामा करुन काम करुन घेणेस व प्रत्यक्ष येणारे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१२) मनपाचे वृक्षसंवर्धन विभागाकडील निविदा नोटीस क्र.२/२०१९-२० मधील बाब क्र.४ अन्वये ड क्षेत्रीय कार्यालयातील रस्ते मध्य दुभाजक सुशोभिकरण देखभाल करणेकामी मे.जी.बी.एन्टरप्रायजेस निविदा र.रू.५८,०४,९२८/- (अक्षरी र.रू.अठठावन्न लाख चार हजार नऊशे अठठावीस फक्त) पेक्षा(-३०.७२ %) याकमी दराची निविदा मंजुर दराने २ वर्ष कालावधीसाठी येणारा खर्च र.रु.४०,२१,६५४/- (अक्षरी र.रु.चाळीस लाख एकवीस हजार सहाशे चोपन्न फक्त) प्रमाणे स्विकृत करुन निविदेतील नियम अटी/शर्तीस अधिन राहुन करारनामा करुन काम करुन घेणेस व प्रत्यक्ष येणारे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१३) मनपाचे वृक्षसंवर्धन विभागाकडील निविदा नोटीस क्र.२/२०१९-२० मधील बाब क्र.५ अन्वये ग क्षेत्रीय कार्यालयातील रस्ते मध्य दुभाजक सुशोभिकरण देखभाल करणेकामी मे.मैत्री स्वयं.सेवा संस्था निविदा र.रू.३१,९३,५८४/-(अक्षरी र.रू.एकतीस लाख त्र्यानव हजार पाचशे चौ-याऐंशी फक्त) पेक्षा (-२६.०० %) याकमी दराची निविदा मंजुर दराने २ वर्ष कालावधीसाठी येणारा खर्च र.रु.२३,६३,२५२/- (अक्षरी र.रु. तेवीस लाख त्रेसष्ट हजार दोनशे बावन्न फक्त) प्रमाणे स्विकृत करुन निविदेतील नियम अटी/शर्तीस अधिन राहुन करारनामा करुन काम करुन घेणेस व प्रत्यक्ष येणारे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१४) मनपाचे वृक्षसंवर्धन विभागाकडील निविदा नोटीस क्र.२/२०१९-२० मधील बाब क्र.६ अन्वये ह क्षेत्रीय कार्यालयातील रस्ते मध्य दुभाजक सुशोभिकरण देखभाल करणेकामी मे.प्रेरणा क्रियेटर्स निविदा र.रू.३३,६६,७९२/- (अक्षरी र.रू.तेहतीस लाख सहासष्ट हजार सातशे ब्यानव फक्त) पेक्षा (-२५.२५ %) कमी दराची निविदा मंजुर दराने २ वर्ष कालावधीसाठी येणारा खर्च रक्कम रुपये २५,१६,६७७/- (अक्षरी र.रु. पंचवीस लाख सोळा हजार सहाशे सत्याहत्तर फक्त) प्रमाणे स्विकृत करुन निविदेतील नियम अटी/शर्तीस अधिन राहुन करारनामा करुन काम करुन घेणेस व प्रत्यक्ष येणारे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१५) मनपाचे वृक्षसंवर्धन विभागाकडील निविदा नोटीस क्र.२/२०१९-२० मधील बाब क्र.९ अन्वये डांगे चौक ते साई चौक(जगताप डेअरी) या बी.आर.टी.रस्त्याचे सुशोभिकरण देखभाल करणेकामी में.कल्याण स्वयं.सेवा सह.संस्था निविदा र.रू.२४,९५,१६०/- (अक्षरी र.रू.चोवीस लाख पंच्यानव हजार एकशे साठ फक्त) पेक्षा (-२५.२५%) या कमी दराची निविदा मंजुर दराने २ वर्ष कालावधीसाठी येणारा खर्च र.रु.१८,६५,१३२/- (अक्षरी र.रु.अठरा लाख पासष्ट हजार एकशे बत्तीस फक्त) प्रमाणे स्विकृत करुन निविदेतील नियम अटी/शर्तीस अधिन राहुन करारनामा करुन काम करुन घेणेस व प्रत्यक्ष येणारे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१६) मनपाचे वृक्षसंवर्धन विभागाकडील निविदा नोटीस क्र.२/२०१९-२० मधील बाब क्र.७ अन्वये देहु आळंदी रस्ता मध्य दुभाजक सुशोभिकरण देखभाल करणेकामी मे.तावरे कंस्ट्रक्शन कंपनी निविदा र.रू.१,०९,८७,८००/- (अक्षरी र.रू.एक कोटी नऊ लाख सत्याऐंशी हजार आठशे फक्त) पेक्षा (-१३.०० %) कमी दराची निविदा मंजुर दराने २ वर्ष कालावधीसाठी येणारा खर्च र.रु.९५,५९,३८६/- प्रमाणे स्विकृत करुन निविदेतील नियम अटी/शर्तीस अधिन राहुन करारनामा करुन काम करुन घेणेस व प्रत्यक्ष येणारे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१७) मनपाचे वृक्षसंवर्धन विभागाकडील निविदा नोटीस क्र.२/२०१९-२० मधील बाब क्र.८ अन्वये पुणे मुंबई हमरस्ता निगडी ते दापोडी रस्ता मध्य दुभाजक सुशोभिकरण देखभाल करणेकामी मे.गार्डन गुरूज फार्म अँन्ड नर्सरी निविदा र.रू.१,४९,७१,८००/- (अक्षरी र.रू.एक कोटी एकोनपन्नास लाख एक्काहत्तर हजार आठशे फक्त) पेक्षा (-१७.०० %) कमी दराची निविदा मंजुर दराने २ वर्ष कालावधीसाठी येणारा खर्च रक्कम रुपये १,२४,२६,५९४/- प्रमाणे स्विकृत करुन निविदेतील नियम अटी/शर्तीस अधिन राहुन करारनामा करुन काम करुन घेणेस व प्रत्यक्ष येणारे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१८) मनपाच्या उद्यान विभागाकडील निविदा नोटीस क्र.२/२०१९-२० काम क्रमांक ४ अन्वये मनपाचे ‘अ’ क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्रमांक १४ मधील विविध उदयाने देखभाल व संरक्षण करणे कामाबाबत मे.अजीत स्वयं.सेवा.सह.संस्था या ठेकेदारांची निविदा रक्कम ७०,२६,६००/- (अक्षरी र.रु.सत्तर लाख सव्वीस हजार सहाशें फक्त) पेक्षा -२७.७७% कमी दराची निविदा मंजुर दराने दोन वर्ष कालावधीसाठी येणारा खर्च रक्कम रुपये ५०,७५,३१३/- (अक्षरी र.रु. पन्नास लाख पंच्याहत्तर हजार तीनशें तेरा फक्त) प्रमाणे स्विकृत करुन निविदेतील नियम अटी/शर्तीस अधिन राहुन करारनामा करुन काम करुन घेणेस व प्रत्यक्ष येणारे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१९) मनपाच्या उद्यान विभागाकडील निविदा नोटीस क्र.२/२०१९-२० काम क्रमांक ५ अन्वये मनपाचे ‘अ’ क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्रमांक १५ मधील विविध उदयाने देखभाल व संरक्षण करणे भाग- १ कामाबाबत मे.दिवंगत महापौर मधुकर पवळे स्वयं.सेवा.सह.संस्था या ठेकेदारांची निविदा र.रू.७८,८७,०००/- (अक्षरी र.रु. अठ्ठयाहत्तर लाख सत्याऐंशी हजार फक्त) पेक्षा -२३.७७% कमी दराची निविदा मंजुर दराने दोन वर्ष कालावधीसाठी येणारा खर्च रक्कम रुपये ६०,१२,२६०/- (अक्षरी र.रु. साठ लाख बारा हजार दोनशें साठ फक्त) प्रमाणे स्विकृत करुन निविदेतील नियम अटी/शर्तीस अधिन राहुन करारनामा करुन काम करुन घेणेस व प्रत्यक्ष येणारे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२०) मनपाच्या उद्यान विभागाकडील निविदा नोटीस क्र.२/२०१९-२० काम क्रमांक ६ अन्वये मनपाचे ‘अ’ क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्रमांक १५, १६ व १७ मधील विविध उदयाने देखभाल व संरक्षण करणे कामाबाबत मे.कोमल स्वयं.सेवा.सह.संस्था या ठेकेदारांची निविदा र.रू.७३,९९,४४०/- (अक्षरी र.रु.त्र्याहत्तर लाख नव्याण्णव हजार चारशें चाळीस फक्त) पेक्षा -२१.००% कमी दराची निविदा मंजुर दराने दोन वर्ष कालावधीसाठी येणारा खर्च र.रु.५८,४५,५५८/- (अक्षरी र.रु.अठ्ठावन्न लाख पंचेचाळीस हजार पाचशें अठ्ठावन्न फक्त) प्रमाणे स्विकृत करुन निविदेतील नियम

अटी/शर्तीस अधिन राहुन करारनामा करुन काम करुन घेणेस व प्रत्यक्ष येणारे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२१) मनपाच्या उद्यान विभागाकडील निविदा नोटीस क्र.२/२०१९-२० काम क्रमांक ७ अन्वये मनपाचे 'अ'क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्रमांक १५ मधील विविध उदयाने देखभाल व संरक्षण करणे (भाग-२) कामाबाबत मे.तावरे फॅसिलिटी मॅनेंजमेंट सर्व्हिसेस प्रा.लिमी. या ठेकेदारांची निविदा रक्कम ६१,०८,८४०/- (अक्षरी र.रु. एकसष्ठ लाख आठ हजार आठशें चाळीस फक्त) पेक्षा -२१.०६% कमी दराची निविदा मंजुर दराने दोन वर्ष कालावधीसाठी येणारा खर्च रक्कम रुपये ४८,२२,३१८/- (अक्षरी र.रु. अठ्ठेचाळीस लाख बावीस हजार तीनशें अठरा फक्त) प्रमाणे स्विकृत करुन निविदेतील नियम अटी/शर्तीस अधिन राहुन करारनामा करुन काम करुन घेणेस व प्रत्यक्ष येणारे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२२) मनपाच्या उद्यान विभागाकडील निविदा नोटीस क्र.२/२०१९-२० काम क्रमांक ८ अन्वये मनपाचे 'अ' क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्रमांक १५ मधील विविध उदयाने देखभाल व संरक्षण करणे (भाग-३) कामाबाबत मे.तावरे कन्स्ट्रक्शंन कंपनी या ठेकेदारांची निविदा रक्कम ७६,८६,२४०/- (अक्षरी र.रु.श्याहत्तर लाख श्याऐंशी हजार दोनशें चाळीस फक्त) पेक्षा -२२.०५%कमी दराची निविदा मंजुर दराने दोन वर्ष कालावधीसाठी येणारा खर्च रक्कम रुपये ५९,९१,४२४/- (अक्षरी र.रु. एकोणसाठ लाख ऐक्याण्णव हजार चारशें चौवीस फक्त) प्रमाणे स्विकृत करुन निविदेतील नियम अटी/शर्तीस अधिन राहुन करारनामा करुन काम करुन घेणेस व प्रत्यक्ष येणारे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२३) मनपाच्या उद्यान विभागाकडील निविदा नोटीस क्र.२/२०१९-२० काम क्रमांक १० अन्वये मनपाचे 'अ' व 'ब' क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्रमांक १८ व १९ मधील विविध उदयाने देखभाल व संरक्षण करणे कामाबाबत मे.निसर्ग लॅण्डस्केप प्रा.लि. या ठेकेदारांची निविदा रक्कम ५३,६३,१६०/- (अक्षरी र.रु. त्रेपन्न लाख त्रेसष्ठ हजार एकशें साठ फक्त) पेक्षा -२५.०७%कमी दराची निविदा मंजुर दराने दोन वर्ष कालावधीसाठी येणारा खर्च रक्कम रुपये ४०,१८,६१६/- (अक्षरी र.रु. चाळीस लाख अठरा हजार सहाशें सोळा फक्त) प्रमाणे स्विकृत करुन निविदेतील नियम अटी/शर्तीस अधिन राहुन करारनामा करुन काम करुन घेणेस व प्रत्यक्ष येणारे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२४) मनपाच्या उद्यान विभागाकडील निविदा नोटीस क्र.२/२०१९-२० काम क्रमांक १६ अन्वये मनपाचे 'फ' क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत प्रभाग क्रमांक १ व ११ मधील विविध

उद्याने देखभाल व संरक्षण करणे कामाबाबत मे.ग्रीनलॅण्ड या ठेकेदारांची निविदा रक्कम ६०,२२,८००/- (अक्षरी र.रु.साठ लाख बावीस हजार आठशें फक्त) पेक्षा -२२.०७% कमी दराची निविदा मंजुर दराने दोन वर्ष कालावधीसाठी येणारा खर्च रक्कम रुपये ४६,९३,५६८/- (अक्षरी र.रु.शेचाळीस लाख त्र्याण्णव हजार पाचशें अड्ुसष्ट फक्त) प्रमाणे स्विकृत करुन निविदेतील नियम अटी/शर्तीस अधिन राहुन करारनामा करुन काम करुन घेणेस व प्रत्यक्ष येणारे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२५) मनपाच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाकडील निविदा सूचना क्रमांक ०४/२०२०-२१ नुसार लघुत्तम निविदा धारक मे. टेक नाईन सर्व्हिसेस यांना आदेश दिनांका पासुन एक वर्षाकरीता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची वेबसाईट होस्टींग व देखभाल दु.रुस्ती करणेचे कामकाज अंदाजपत्रकीय दरांपेक्षा -५.४०% ने कमी दराचे र.रू.१५,८६,४७३/- (अक्षरी र.रू.पंधरा लाख शहाऐंशी हजार चारशे त्र्याहत्तर फक्त) अधिक वस्तु व सेवा कर देणेकामी त्यांचेसोबत केलेल्या कामाचा करारनामा व कामकाजाचे आदेश क्र.मातवि/११/कावि/१६६/२०२० दि.२४ सप्टेंबर २०२० अन्वये निर्गत करण्यात आलेले असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.२६) पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत मनपा हद्दीतील दिव्यांग व्यक्तींकरीता विविध प्रकारच्या कल्याणकारी योजना राबविणेत येतात. सन २०२०-२१ या आर्थिक वर्षासाठी दिव्यांग कल्याणकारी योजना या उपलेखाशिर्षावर एकूण २१ उपयोजना असून सदर एकत्रित उपलेखाशिर्षासाठी एकुण र.रु.२७,१६,००,०००/- (अक्षरी र.रु.सत्तावीस कोटी सोळा लाख फक्त) इतकी तरतूद करण्यात आली आहे. त्यापैकी "उपलेखाशिर्ष क्र.१४ "पंडीत दीनदयाल उपाध्याय-दिव्यांग पेन्शन योजना" या उपलेखाशिर्षावर र.रु.८,५०,००,०००/- (अक्षरी र.रु.आठ कोटी पन्नास लाख फक्त) इतकी तरतूद करणेत आली असून आज अखेर सदर उपलेखाशिर्षावर र.रू.६,९०,९४,४४०/- (अक्षरी र.रु.सहा कोटी नव्वद लाख चौ-यान्नव हजार चारशे चाळीस फक्त) इतका खर्च झाला आहे. सद्य स्थितीत कोविड-१९ या आजारामुळे शासनाचे निर्देशानुसार दिव्यांग व्यक्तींना दिला जाणारा सहामाही/वार्षिक पेन्शनचा लाभ हा प्रति माह देण्यात येत आहे. त्यामुळे एकुण ३७२५ पात्र लाभार्थ्यांना प्रति लाभार्थी प्रति माह र.रु.२०००/- प्रमाणे एकुण र.रू.७४,५०,०००/- (अक्षरी र.रु.चौ-याहत्तर लाख पन्नास हजार फक्त) इतके अर्थसहाय्य देण्यात येत आहे. आज अखेर सदर योजनेवर र.रू.१,५९,०५,५६०/- इतकी तरतुद शिल्लक असुन मार्च २०२१ पर्यंत पेन्शन योजनेसाठी र.रू.५,९६,००,०००/- इतका खर्च होणार आहे. त्यापैकी शिल्लक तरतुदी व्यतिरिक्त र.रू.४,३७,००,०००/- इतकी खर्चासाठी तरतूद

करणे आवश्यक आहे. तथापि सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात, लेखाशिर्ष दिव्यांग कल्याणकारी योजना या मुख्य लेखाशिर्षांतर्गत उपलेखाशिर्ष क्र.१४ “पंडीत दीनदयाल उपाध्याय-दिव्यांग पेन्शन योजना” या उपलेखाशिर्षावर र.रु.८,५०,००,०००/- (अक्षरी र.रु.आठ कोटी पन्नास लाख फक्त) इतकी तरतूद करणेत आली आहे. आज अखेर सदर उपलेखाशिर्षावर र.रू.१,५९,०५,५६०/- (अक्षरी र.रु.एक कोटी ऐकोणसाठ लाख पाच हजार पाचशे साठ फक्त) इतकी तरतूद शिल्लक असून इतर उपलेखाशिर्षावरुन र.रु.४,३७,००,०००/- (अक्षरी र.रु.चार कोटी सदोतीस लाख फक्त) वर्ग करणे आवश्यक आहे. सदर उपयोजनेतील पात्र लाभार्थ्यांना लाभ अदा करणेकामी वाढीव रक्कम वर्ग करणे आवश्यक आहे. त्यानुसार दिव्यांग कल्याणकारी योजना या मुख्य लेखाशिर्षांतर्गत सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षात उपलेखाशिर्ष क्र. ०८- “मनपा हद्दीतील अंध नि समर्थ (दिव्यांग) कर्णबधीर, मतीमंद व्यक्तींना PMPMLचे बस पासेस मोफत देणे”या उपलेखाशिर्षावरून र.रू.२,००,००,०००/-(अक्षरी रक्कम रुपये दोन कोटी फक्त), उपलेखाशिर्ष क्र.११ “इतर योजना/कार्यक्रम” या उपलेखाशिर्षावर र.रु.१,००,००,०००/- (अक्षरी र.रु.एक कोटी फक्त) उपलेखाशिर्ष क्र.१८ “मनपा हद्दीतील दिव्यांगांना मा.प्रधानमंत्री आवास योजना व इतर घरकुल योजनेअंतर्गत घर खरेदीकामी र.रु.१,००,०००/- अर्थसहाय्य देणेबाबत” या उपलेखाशिर्षावरून र.रू.३७,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये सदोतीस लाख फक्त) व उपलेखाशिर्ष क्र.१९ “मनपा हद्दीतील दिव्यांगांचे सक्षमीकरण/सामाजिक समावेशन करणेकामी प्रत्यक्ष काम करणा-या मनुष्यबळाची क्षमता बांधणी/प्रशिक्षण/कार्यशाळा/तज्ञ नेमणूक इ. आवश्यक कामकाज करणे” या उपलेखाशिर्षावरून र.रू.१,००,००,०००/- (अक्षरी र.रु.एक कोटी फक्त) असे एकुण र.रू.४,३७,००,०००/- (अक्षरी र.रु.चार कोटी सदोतीस लाख फक्त ) वर्ग करणे योग्य होईल.

| **लेखाशिर्षाचे नाव** | **अ. क्र.** | **उपलेखाशिर्षाचे नाव व क्रमांक** | **सन २०२०-२१ ची तरतूद** | **आवश्यक तरतूद वाढ करावयाची रक्कम** | **आवश्यक तरतूद घट करावयाची रक्कम** | **सुधारीत तरतूद सन २०२०-२१** |
|---|---|---|---|---|---|---|
| **दिव्यांग कल्याणकारी योजना**<br><br>**रक्कम रुपये २७,१६,००,०००/-** | १. | उपलेखाशिर्ष क्र.०८ -<br><br>“मनपा हद्दीतील अंध,निः समर्थ (दिव्यांग) कर्णबधीर, मतीमंद व्यक्तींना PMPMLचे बस पासेस मोफत देणे” | ६,००,००,०००/- | | २,००,००,०००/- | ४,००,००,०००/- |
| | २. | उपलेखाशिर्ष क्र. ११ “इतर योजना/कार्यक्रम” | १,००,००,०००/- | | १,००,००,०००/- | ०/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ३. | उपलेखाशिर्ष क्र.१८ "मनपा हद्दीतील दिव्यांगांना मा. प्रधानमंत्री आवास योजना व इतर घरकुल योजनेअंतर्गत घर खरेदीकामी र.रु.१,००,०००/- अर्थसहाय्य देणेबाबत" | १,००,००,०००/- | | ३७,००,०००/- | ६३,००,०००/- |
| | ४. | उपलेखाशिर्ष क्र.१९ "मनपा हद्दीतील दिव्यांगांचे सक्षमीकरण/सामाजिक समावेशन करणेकामी प्रत्यक्ष काम करणा-या मनुष्यबळाची क्षमता बांधणी/प्रशिक्षण /कार्यशाळा/तज्ञ नेमणूक इ.आवश्यक कामकाज करणे" | २,००,००,०००/- | | १,००,००,०००/- | १,००,००,०००/- |
| | ५. | उपलेखाशिर्ष क्र.१४ पंडित दिनदयाल उपाध्याय- दिव्यांग पेन्शन योजना | ८,५०,००,०००/- | ४,३७,००,०००/- | ०/- | १२,८७,००,०००/- |

उपरोक्त तक्त्यात नमूद केलेनुसार सन २०२०-२१ मधील उपलेखाशिर्षांमध्ये वाढ / घट करणे आवश्यक असून सदरचे वर्गीकरण हे विभागाअंतर्गत वर्गीकरण असल्याने त्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२७) म.न.पा वृक्षसंवर्धन विभागाकडील निविदा नोटीस क्र.१/२०१९-२० मधील मनपाचे वृक्षसंवर्धन विभागासाठी से.नं.२७ नर्सरीसाठी माळी व मजुर कर्मचारी पुरविणेकामी मे.अथर्व स्वयं. औदयो. सेवा सहकारी संस्था मर्या. निविदा र.रू.२५,६०,२०६/- (अक्षरी र.रू.पंचवीस लाख साठ हजार दोनशे सहा फक्त) या ठेकेदाराची निविदा अंदाजप्रकिय दरापेक्षा ३.९९%ने कमी दराची निविदा स्वीकृत करणेत आली असून त्याप्रमाणे येणारा खर्च र.रू.२४,५८,०५४/- चे खर्चास मान्यता मिळावी व त्यांचेशी करारनामा करून कामाचा आदेश देणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२८) मनपाचे विद्युत विभागासाठी आवश्यक विविध लॅम्प साहित्य खरेदीबाबत ई निविदा क्र.15/2020-21 अन्वये सात निविदा प्राप्त झाल्या आहेत. यापैकी प्राप्त लघुत्तम निविदाका मे.ब्राईटशाईन असोसिएट्स यांचे बाब क्र.1 ते 3 एकुण 03 बाबी साहित्याचे लघुत्तम दर एकुण र.रू.15,24,000/- हे अंदाजपत्रकीय दर र.रू.19,76,000/- पेक्षा -22.87% ने कमी असल्याने सदर दर स्विकृत करण्यात आलेले आहेत. यानुसार सदर लघुत्तम निविदाकार यांचेबरोबर करारनामा करुन त्यांना पुरवठा आदेश निर्गत करणेची कार्यवाही करणेत आलेली असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.२९) मनपाचे अग्निशामक विभागास आवश्यक Automatic Portable Fire Extinguisher 1 kg पुरवठा करून बसविणे, चे साहित्य खरेदीबाबत ई निविदा क्र.14/2020-21 अन्वये पाच निविदा प्राप्त झाल्या आहेत. यापैकी प्राप्त लघुत्तम निविदाकार मे.जिजाई एंटरप्रायजेस यांचे बाब क्र.1 एकुण 01 बाबी साहित्याचे लघुत्तम दर एकुण र.रू.14,85,900/- (अक्षरी र.रू.चौदा लाख पंच्याऐंशी हजार नउशे फक्त) हे अंदाजपत्रकीय दर र.रू.14,89,710/- पेक्षा -0.26% ने कमी असल्याने सदर दर स्विकृत करण्यात आलेले आहेत. यानुसार सदर लघुत्तम निविदाकार यांचेबरोबर करारनामा करुन त्यांना पुरवठा आदेश निर्गत करणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.३०) पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडील नि.नो.क्र.ENV4/1-2019-20 अन्वये उर्जा बचतीच्या अंतर्गत पिं.चिं. मनपाच्या अ,ब,फ व ग प्रभागातील मैलाशुध्दीकरण केंद्रे व मैलापाणी पंप हाऊसचे इमारतीवर उर्जा निर्मितीकामी सोलर सिस्टीम बसविणे व अनुषंगीक कामे करणेकामी मे.इलेक्ट्रो मेकॅनिक्स यांचेकडुन निविदा र.रु.६७,०४,८३४/- (अक्षरी र.रू.सदुसष्ठ लाख चार हजार आठशे चौतीस फक्त) वर निविदा दर प्राप्त झाले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदारांकडून र.रु.६७,०४,८३४/- पेक्षा **-**१४.५०% कमी या सुधारित दराने म्हणजेच र.रु.५७,३२,६३३/- पर्यंत काम करुन घेणेस व नियमानुसार निविदा अटी प्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर वेगळा अदा करणेस तसेच निविदा अटी नुसार भाववाढ कलम लागु असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील. या अटीस अधिन राहून त्यांचेसोबत करारनामा करुन कामाचे आदेश देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.३१) मनपाचे कै.आण्णासाहेब मगर स्टेडीयम व ऑटो क्लस्टर कोविड केअर सेंटरसाठी 04 प्रकारचे लिनन साहित्य खरेदीसाठी अल्पमुदतीची जाहिर सुचना क्र.26/2020-21 नुसार मे.सिद्धी कॉपिअर्स, मे.महावीर कॉर्पोरेशन, मे.रेखा इंजिनिअरिंग वर्क्स, मे आध्या प्रॉपर्टीज, मे.पी शेषाद्री & कंपनी, मे.शिवसमर्थ एंटरप्रायजेस व मे.ऑस्टीन हेल्थ केअर

यांचे प्राप्त झालेले लघुतम दर र.रु.45,22,905/- (अक्षरी र.रू.पंचेचाळीस लाख बावीस हजार नऊशे पाच फक्त) स्विकृत करणेत आलेले असून र.रु.45,22,905/- (अक्षरी र.रू.पंचेचाळीस लाख बावीस हजार नऊशे पाच फक्त) चे खर्चास कार्योत्तर मान्यता व मे,सिद्धी कॉपिअर्स, मे.महावीर कॉर्पोरेशन, मे.रेखा इंजिनिअरिंग वर्क्स, मे.आध्या प्रॉपर्टीज, मे.पी.शेषाद्री & कंपनी, मे.शिवसमर्थ एंटरप्रायजेस व मे.ऑस्टीन हेल्थ केअर यांचेबरोबर कार्योत्तर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.३२) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागाकडील मागणीनुसार अनधिकृत बांधकाम कारवाई तसेच विविध प्रकल्पांचे उदघाटन/ भूमिपूजन, विविध प्रबोधनपर्व कार्यक्रम, सत्कार समारंभ, महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा, विविध विषय समिती निवडणूक, महापौर, उप महापौर निवडणूक, प्रभाग अध्यक्ष निवडणूक, करसंकलन विभागाकडील कारवाई, पवनाथडी, स्वरसागर संगीत महोत्सव, विविध सांस्कृतिक कार्यक्रम इ. कार्यक्रमांचे व्हिडीओ शुटींग व त्याअनुषंगाने इतर कामकाजासाठी निविदा नोटीस प्रसिध्द करुन मे. दर्शन डिजिटल व्हिडीओग्राफी, कृष्णानगर, चिंचवड,पुणे– 19 कमीत कमी दर प्राप्त झालेने त्यांना पुरवठा आदेश निर्गत करण्यात आलेले आहेत. मंजूर निविदा दरानुसार त्यांकडून कामकाज करुन घेण्यात येत असून याकामी निविदा रक्कम पूर्ण वर्षासाठी र.रु20,83,080/- इतकी असून र.रु.20,83,800/- ची बिले त्यांना अदा करण्यात आलेली आहेत. केंद्र शासन व राज्य शासनाने कोरोना व्हायरसचा प्रादुर्भाव होवू नये तसेच अत्यावश्यक बाबम्हणून आवश्यक त्या सर्व उपाय योजना अवलंबण्या संदर्भात सुचनांच्या अनुषंगाने कोरोना व्हायरसचा प्रसार रोखण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाय योजना तातडीने अंमलात आणणे आवश्यक असलेने माहे मार्च 2020 पासून संपूर्ण देशामध्ये लॉकडाऊन जाहिर करण्यात आले होते. त्याअनुषंगाने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम अतिक्रमण नियंत्रण व निर्मुलन विभागामार्फत कोरोना विषाणूचा संसर्गव प्रादुर्भाव रोखण्यासाठी अतिक्रमण विभाग व संबंधित पोलिस स्टेशनकडील अधिकारी यांचे पथक निर्माण करुन सिटी लॉक डाऊन करण्याचे कामकाज दि.20/03/2020 पासून सुरु करण्यात आले. याकामी ८ व्हिडीओग्राफर तात्काळ पुरविणेबाबत संबंधित विभागाने पत्र क्र.बीपी/05/कावि/42/2020, दि.19/03/2020 अन्वये कळविण्यात आले होते. त्याअनुषंगाने मंजूर निविदाधारक मे.दर्शन डिजिटल व्हिडीओग्राफी, कृष्णानगर, चिंचवड, पुणे–19 यांचेकडून ८ व्हिडीओग्राफर व फोटोग्राफर माहे मार्च 2020 ते सप्टेंबर 2020 या कालावधीत पुरवून कामकाज पूर्ण करुन घेण्यात आले आहे. कामकाज पूर्ण करुन मे.दर्शन डिजिटल व्हिडीओग्राफी, कृष्णानगर, चिंचवड,पुणे–19 यांनी र.रु.29,45,530/- (अक्षरी र.रू.एकोणतीस लाख पंचेचाळीस हजार पाचशे तीस फक्त)ची

बिले मिळणेकामी सादर केले आहेत. सदरचे काम निविदा रकमेपेक्षा अधिक झाले असलेने त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.३३) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ क्षेत्रीय कार्यालयाकडील विदयुत विभागाचे निविदा कामांच्या सोबतचे प्रपत्र 'अ' मधील (1 ते 30) नियमानुसार व निविदा अटी-शर्ती प्रमाणे लघत्तम दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असुन मंजुर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.३४) पिंपरी चिंचवड शहराकरिता पवना प्रकल्पासुन टप्पा क्र.४ साठी ४८.५७६ दलघमी पाणी पुर्न:आरक्षित करणेस शासन निर्णय क्र.बि.सिं.आ/२०१८/(३९१/१८)/सिं.व्य(धो) दि.२४/१०/२०१८ व शुद्धीपत्रक शासन निर्णय क्र.बि.सिं.आ./२०१८/(३९१/१८)/सिं. व्य.(धो) दि.१३/११/२०१८ अन्वये मंजूरी प्राप्त झालेली आहे. त्याअनुषंगाने पिंपरी चिंचवड मनपास पत्र मु.अ.(जसं)/(४४/२०१८) प्रशा-८/१११ दि.०७/०१/२०१९ व पत्र पुपावि/प्रशा-१/बि.सिं./पिं.चिं.मनपा/इरादापत्र/३४७/सन २०१९ अन्वये ज्ञापन व इरादा पत्र देण्यात आले आहे. सदर ज्ञापनातील सर्व अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे तसेच उपरोक्त आरक्षणापोटी सिंचन पुनस्थापनेसाठी र.रु.५०४०.१९ लक्ष पैकी (शासन निर्णयातील अ.क्र.६ आणि प्रदेश कार्यालयाचे ज्ञापन नुसार महानगरपालिकेस सिंचन पुनस्थापना खर्च एक रक्कमी भरणे बंधनकारक करणे ऐवजी सन २०१८-१९ पासून पुढील ५ वर्षात टप्प्याटप्प्याने घेणेत यावा असे नमुद आहे) सन २०१८-१९ साठीच्या सिंचन पुनस्थापना खर्चापोटी रु.१०,०८,०३,०००/- तसेच दोन महिन्याची पाणीपट्‌टी अनामत र.रु.५३,५७,९९९/- चे धनाकर्ष पाटबंधारे विभागाकडे जमा करण्यात आला आहे व सन २०१९-२० चा सिंचन पुनस्थापना खर्चाचा दुसरा हप्ता र.रु.१०,०८,०३,०००/- भरणा करण्यात आला आहे. पाटबंधारे विभागाने २ महिन्याची सुधारित पाणीपट्‌टी अनामत र.रु.३,४५,३९,६५१/- येत असुन यापूर्वी जमा र.रु.२,५४,३७,६९६/- व सन २०१८-१९ मध्ये भरलेली अनामत र.रु.५३,५७,९९९/- इतकी रक्कम वजा जाता उर्वरित र.रु.३७,४३,९५६/- चा भरणा करणेस व तदनंतर करारनामा मंजूर करणेत येणार असले बाबत कळविले आहे. सदर कामाकरिता सन २०२०-२१ च्या मूळ अंदाजपत्रकात पाणीपुरवठा विशेष योजना निधी या लेखाशिर्ष अंतर्गत पान क्र.२३८ वर अ.क्र.१ "पिंपरी चिंचवड महानगरपालिकेसाठी पाण्याचा अतिरिक्त (Source) स्त्रोत निश्चित करणे त्यातील पाणी साठा आरक्षित करणे व तदनुषंगिक कामे करणे" याकामाअंतर्गत र.रु.५० कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे. तरी, वरील नमूद प्रमाणे पवना धरणातून टप्पा क्र.४ साठी ४८.५७६ दलघमी पाणी आरक्षणापोटी पाटबंधारे विभागाने उर्वरित अनामत र.रु.३७,४३,९५६/- चा धनादेश कार्यकारी अभियंता, पुणे पाटबंधारे विभाग, पुणे यांना देणेस

मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.३५) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे JNNURM अंतर्गत पवना धारणतून से,क्र.२३ जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत थेट पाईप लाईनने पाणी आणणे या प्रकल्पाचे काम हाती घेतले आहे. या कामास मनपा हद्दीबाहेर पवना धरणग्रस्थानी, स्थानिक शेतक-यांनी तसेच भारतीय किसान संघ व इतर यांनी मोठ्या प्रमाणात विरोध केला आहे. मा.उच्च न्यायालयाने दि.१९/१०/२०१० रोजी सदर जनहित याचिका फेटाळली होती. मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार, भारतीय किसान संघ व इतर यांनी मा.मुख्य अभियंता तथा मा.प्राथमिक विवाद निवारण अधिकारी यांनी दि.२७/०१/२०१० रोजी दिलेल्या निर्णयाच्या विरोधात, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (MWRRA) यांचेकडे अपील केले होते.सदर अपिलाची सुनावणी होऊन MWRRA ने दि.१६/०५/२०१२ रोजी आदेश दिलेले आहेत. त्यानुसार काही निर्देश देऊन पवना धरणातून थेट पाईपलाईन प्रकल्प राबविणेस मान्यता देऊन, भारतीय किसान संघ व इतर यांचे अपील फेटाळले आहे. सदर निर्देशामध्ये पवना नदीवर पि.चि.मनपाने स्वतःच्या खर्चाने दोन कोल्हापूर पद्धतीचे बंधारे (K.T.Weir) बांधणेच्या कामाचा समावेश आहे. त्यानुसार उप कार्यकारी अभियंता, खडकवासला पाटबंधारे विभाग,पुणे यांनी अनामत ठेव रकमेवर पवना नदीवर मौजे शिवणे व मौजे गहुंजे ता.मावळ, जि.पुणे येथील प्रस्तावित को.प.बंधा-या बाबत मनपाकडून उपलब्ध होणा-या अनामत ठेव रकमेतून नवीन बंधारे महाराष्ट्र जलसंपत्ती नियामक प्राधिकरनाणे दिलेल्या निर्णयाप्रमाणे बांधणे प्रस्तावित असलेबाबत कळविले आहे.त्यानुसार आत्तापर्यंत खडकवासला पाटबंधारे विभागास आतापर्यंत कोल्हापूर पद्धतीच्या बंधारे सर्वेक्षणाच्या कामासाठी व सविस्तर अंदाजपत्रक तयार करणेसाठी र.रु.७,००,०००/- व भूशास्त्रिय कार्य (Core Logging) कामासाठी र.र.७,७०,०००/- असे एकूण र.रु.१४,७०,०००/- अदा करणेत आले आहे. मा.आयुक्त यांनी अनामत ठेव पद्दतीने (Deposit Contribution Work) पवना नदीवर मौजे शिवणे व गहुंजे, ता.मावळ, जि.पुणे येथील प्रस्तवित कोल्हापूर पद्धतीचा बंधारा बांधणेच्या कामाची निविदा काढून, कामाचे आदेश देऊन काम चालू करणेबाबत कार्यकारी अभियंता खडकवासला पाटबंधारे विभाग, पुणे – ११ यांना कळविलेले आहे. दि.२२/०९/२०२० च्या पत्रान्वये उप कार्यकारी अभियंता खडकवासला पाठबंधारे विभाग, पुणे- ११ यांनी मौजे शिवणे व गहुंजे ता. मावळ, जि.पुणे येथील कोल्हापुर बंधा-यांचे काम सल्ला मसलत तत्वावर मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांचेकडून करून घेणेबाबत व त्या सोबत सल्ला मसलत व संकल्पनाची फी र.रू.३६,०४,९००/- (अक्षरी र.रू.छत्तीस लाख चार हजार नऊशे फक्त) अदा करणेबाबत मनपास कळविले आहे. अधिक्षक अभियंता (धरण) संकल्प चित्र मंडळ, मध्यवर्ती संकल्प चित्र संघटना, नाशिक यांचेमार्फत सदर

बंधा-यांच्या बांधकामासाठी सल्ला मसलत व संकल्पन करणेचे काम करणेत येणार आहे. सन २०२०-२१ च्या अंदाजपत्राकात पाणीपुरवठा टप्पा -१ जे.एन.एन.यु.आर.एम. या लेखाशिर्षाअंतर्गत (पान क्र.६४४ अ.क्र.५ वर) पवना नदीवर मौजे शिवणे व गंहुजे येथे कोल्हापुर बंधारा बांधणेकामी र.रू.२०,००,००,०००/- एवढी तरतूद करणेत आलेली आहे.तरी अनामत ठेव रकमेवर पवना नदीवर मौजे शिवणे व मौजे गहुंजे ता.मावळ,जि.पुणे येथील प्रस्तावित कोल्हापूर पद्धतीच्या बंधारा बांधणेचे काम चालू करणेबाबत चालू करणेच्या कामासाठी उप कार्यकारी अभियंता खडकवासला पाठबंधारे विभाग,पुणे-११ यांना सल्लामसलत व संकल्पनाची फी र.रू.३६,०४,९००/-(अक्षरी र.रू. छत्तीस लाख चार हजार नऊशे फक्त)अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.३६) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागाकडील संगणक यंत्रणा देखभाल दुरुस्तीकरीता ई-निविदा सुचना क्रमांक ०३/२०२०-२१ अन्वये महाटेंडर प्रक्रियेअंतर्गत प्रसिध्द करुन सर्व करासह निविदा दर मागविण्यात आलेल्या आहेत. त्यामधे एकुण तीन निविदाकारांनी निविदा दर सादर केलेले आहेत. त्यापैकी मे.पोलस्टार कंन्स्लटींग प्रा.लि. यांचे दर एकुण र.रु.१,१८,३८,२५०/- असे सर्वात लघुत्तम प्राप्त झालेले आहेत. प्राप्त दर कमी करुन देणेकामी कळविण्यात आले असता त्यांनी र.रु.१०,०००/- कमी करुन दिलेले आहेत. त्यानुसार एकुण र.रु.१,१८,२८,२५०/- हे अंदाजपत्रकीय रक्कमेचे तुलनेत ०.८१ टक्केने कमी आहेत. सबब सन २०२०-२१ या १ वर्षे कालावधीकरीता महापालिकेच्या सर्व विभागाकडील संगणक यंत्रणा देखभाल व दुरुस्तीकामी येणा-या एकुण र.रु.१,१८,२८,२५०/- + GST सह चे खर्चास व लघुत्तम निविदाकार मे.पोलस्टार कंन्स्लटींग प्रा.लि. पुणे यांचे बरोबर कामाचा करारनामा करणेकामी मान्यता देणेबाबत विचार करणे.

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/३/कावि/९९७/२०२०
दिनांक – ०१/१०/२०२०

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.

(क्र.स्था/श.अ./तां/कावि/२००/२०२० दि.२८/०९/२०२० विषय क्र.९ चे लगत)

PIMPRI CHINCHWAD MUNICIPAL CORPORATION

EMPANELMENT OF PROJECT MANAGEMENT CONSULTANTS

**Road & Storm water Drainage Projects, General civil engineering works (ANNEXURE-'A)'**

| Sr.no | Name of Consultant | Details of Experience | Name of Firm / Personal | Phone No | Pan and Adhar no | E-mail | Adress | Year of Registration | Work Experience | Annual Turn Over | Employee Details | Eligible or Not-Eligibal (For Which Category) | Reason |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **CATEGORY-II (BETWEEN 5 to 20 Cr. WORKS)** | | | | | | | | | | | | | |
| 1 | Priya Narayan Pawar | **ROAD** | Nexus Techno Consultant | 9822163569 | AANFN1861F | nexustechnoconsultants@gmail.com | Flat no.3,siddharth housing society,aundh,pune | ....... | As per EOI | As per EOI | As per EOI | **Eligible for A-II** | As per Seprate Sheet Attatched |

**Add.Commissioner-1**
**PCMC, Pimpri-18**

## (क्र.क्षेका/नि-७/कावि/६१/२०२० दि.२८/०९/२०२० विषय क्र.३३ चे लगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, अ क्षेत्रीय कार्यालय, निगडी-44

विषयपत्र क्र.अक्षेका/नि-7/कावि/161/2020 दि.28/09/2020 लगत

प्रपत्र " अ " - अ विद्युत विभाग

| अ क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्र. | कामाचे नाव | करारनामा दिनांक | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेश दिनांक | निविदा रक्कम | निविदा स्विकृत दर | | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम खालीलप्रमाणे (+ त्यावरील वस्तु व सेवा कर प्रचलित दराने अदा करावा.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 12 | | 13 |
| 1 | मे.शार्दुल इलेक्ट्रीकल इंजिनिअरींग | 1/18/2019-20 | अ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र. १९ मधील विद्युत व्यवस्थेचे देखभाल दुरुस्ती करणे.(सन २०१९-२०) | 19/09/2019 | अक्षेका/ नि-7/ कावि/173/2019 | 19/09/2019 | 802953 | 19.99 | %कमी | 642443 |
| 2 | मे.ओमकार इंजिनिअरींग | 1/9/2019-20 | अ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र. १५ मधील विविध उद्यानामधील विद्युत व्यवस्थेचे देखभाल दुरुस्ती करणे. १९-२० | 19/092019 | अक्षेका/ नि-7/ कावि/172/2020 | 20/09/2019 | 803481 | 19.99 | %कमी | 642865 |
| 3 | मे.ओमकार इंजिनिअरींग | 1/5/2019-20 | अ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र. १४ मधील विद्युत व्यवस्थेचे चालन व देखभाल दुरुस्ती करणे.(सन २०१९-२०) | 28/8/2019 | अक्षेका/ नि-7/ कावि/158/2019 | 30/08/2019 | 760909 | 19.99 | %कमी | 608803 |
| 4 | मे.क्वालीटी इलेक्ट्रीकल्स एन्टरप्रायझेस | 1/12/2019-20 | अ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत आकुर्डी एम. आय. डी. सी. उपविभागामधील मनपाच्या विविध इमारतीचे विद्युत विषयक देखभाल दुरुस्ती करणे.(सन २०१९-२०) | 07/12/2019 | अक्षेका/ नि-7/ कावि/27/2020 | 22/01/2020 | 801491 | 10.00 | %कमी | 721342 |
| 5 | मे.व्यंकटेश्वरा टर्नकी प्रोजक्ट सोल्युशन प्रा. लिमिटेड | 1/15/2019-20 | अ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत विविध इतारतीमधील वातानुकूलन यंत्रणेचे वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे. (सन २०१९-२०) | 10/12/2019 | अक्षेका/ नि-7/ कावि/302/2019 | 30/12/2019 | 669028 | 16.03 | %कमी | 561783 |
| 6 | मे.जे.पी.ट्रॅफिक ऑटोमेशन प्रा. लि पुणे | 1/13/2019-20 | अ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र. १० व १९ मधिल विविध चौकातील वाहतुक नियंत्रक दिव्यांची देखभाल दुरुस्ती करणे. (सन २०१९-२०) | 07/12/2019 | अक्षेका/ नि-7/ कावि/234/2019 | 09/12/2019 | 668149 | 2.00 | %कमी | 654786 |
| 7 | मे.मोरया मंडप डेकोरेटर्स | 3/4/2019-20 | अ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्र. १९ मध्ये होणाऱ्या विविध कार्यक्रमांकरीता तात्पुरती स्वरूपात ध्वनीक्षेपण व प्रकाश व्यवस्था करणे. (सन १९ - २०) | 24/12/2019 | अक्षेका/ नि-7/ कावि/288/2019 | 30/12/2019 | 581298 | 3.25 | %कमी | 562406 |
| 8 | मे.एसीई कम्युनिकेशन | 3/12/19-20 | अ क्षेत्रीय कार्यालय कार्यलय कार्यक्षेत्रातील EPABX यंत्रणेचे देखभाल दुरुस्ती व नुतनीकरणाची कामे करणे.( १९-२०) | 07/12/2019 | अक्षेका/ नि-7/ कावि/284/2019 | 30/12/2019 | 397010 | 10.00 | %कमी | 357309 |

| अ. क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्र. | कामाचे नाव | करारनामा दिनांक | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेश दिनांक | निविदा रक्कम | निविदा स्विकृत दर | | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम खालीलप्रमाणे (+ त्यावरील वस्तु व सेवा कर प्रचलित दराने अदा करावा.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | मे.पी.एम.के.इलेक्ट्रीकल्स | 1/3/2019-20 | अ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र. १० मधील विद्युत व्यवस्थेचे देखभाल दुरुस्ती करणे. (सन २०१९-२०) | 16/12/2019 | अक्षेका/ नि-7/ कावि/281/2019 | 22/01/2020 | 803485 | 21.21 | %कमी | 633066 |
| 10 | मे.ओम रेणुका एंटरप्रायझेस | 1/1/2019-20 | अ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र. १० मधील विद्युत व्यवस्थेचे चालन व देखभाल दुरुस्ती करणे.(सन २०१९-२०) | 07/11/2019 | अक्षेका/ नि-7/ कावि/300/2019 | 30/12/2019 | 803450 | 23.99 | %कमी | 610702 |
| 11 | मे.मोरया मंडप डेकोरेटर्स | 3/2/2019-20 | अ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत म. फुले जयंती व डॉ. आंबेडकर जयंती व अन्य कार्यक्रमांसाठी तात्पुरती जनित्रसंच, विद्युत रोषणाई व अन्य विद्युत विषयक कामे करणे. (सन १९ - २०) | 24/12/2019 | अक्षेका/ नि-7/ कावि291/2020 | 30/12/2019 | 847320 | 7.35 | %कमी | 785042 |
| 12 | मे.ओंकार इलेक्ट्रीकल्स | 1/8/2019-20 | अ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र. १५ मधील विद्युत व्यवस्थेचे देखभाल दुरुस्ती करणे.(सन १९-२०) | 19/09/2019 | अक्षेका/ नि-7/ कावि/171/2020 | 19/09/2019 | 803495 | 19.99 | %कमी | 642876 |
| 13 | मे.मोरया मंडप डेकोरेटर्स | 3/7/2019-20 | अ क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र. १४ येथील विठ्ठलवाडी , दत्तवाडी व इतर परिसरातील पालखी व अन्य कार्यक्रमाकरिता तात्पुरती ध्वनिविक्षेपण , प्रकाश व्यवस्था, जनित्रसंच, सी.सी.टीव्ही व अन्य विद्युत विषयक कामे करणे. ((सन २०१९-२०) करीता) | 24/12/2019 | अक्षेका/ नि-7/ कावि/290/2019 | 30/12/2019 | 845791 | 6.00 | %कमी | 795044 |
| 14 | मे.मोरया मंडप डेकोरेटर्स | 3/1/2019-20 | अ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र. १० मध्ये मनपाच्या विविध कार्यक्रमासाठी तात्पुरती ध्वनिक्षेपण, CCTV, जनरेटर, विद्युत रोषणाई व इतर विद्युत विषयक कामे करणे. (सन २०१९ - २०) | 24/12/2019 | अक्षेका/ नि-7/ कावि/285/2019 | 30/12/2019 | 845401 | 3.20 | %कमी | 818348 |
| 15 | मे.जे.पी.ट्रॅफिक ऑटोमेशन प्रा. लि पुणे | 3/13/2019-20 | अ क्षेत्रिय कार्यालयांतर्गत निगडी प्राधिकरण उपविभागामधील प्र.क.१४ व १५ मधील विविध चौकातील वाहतुक नियंत्रक दिव्यांची देखभाल दुरुस्ती करणे. | 24/12/2019 | अक्षेका/ नि-7/ कावि/293/2019 | 30/12/2019 | 669620 | 2.00 | %कमी | 656228 |
| 16 | मे.मोरया मंडप डेकोरेटर्स | 3/3/2019-20 | अ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत म. फुले जयंती व डॉ. आंबेडकर जयंती व अन्य कार्यक्रमांसाठी तात्पुरती स्वरूपातील ध्वनिक्षेपण,CCTV व अन्य विद्युत विषयक कामे करणे. (सन १९ - २०) | 24/12/2019 | अक्षेका/ नि-7/ कावि/289/2019 | 30/12/2019 | 842200 | 7.35 | %कमी | 780298 |

| अ. क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्र. | कामाचे नाव | करारनामा दिनांक | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा आदेश दिनांक | निविदा रक्कम | निविदा स्विकृत दर | | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम खालीलप्रमाणे (+ त्यावरील वस्तु व सेवा कर प्रचलित दराने अदा करावा.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 17 | मे.विजय इलेक्ट्रीकल्स ॲण्ड जनरेटर्स | 3/6/2019-20 | अ क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र. १५ मधील से.क्र. २३,२४,२५,२६,२७-अ व २८ येथील विविध कार्यक्रमाकरिता तात्पुरती ध्वनिविक्षेपण, प्रकाश व्यवस्था , जनित्रसंच, सी.सी.टीव्ही व अन्य विद्युत विषयक कामे करणे. ((सन २०१९-२०) करीता) | 24/12/2019 | अक्षेका/ नि-7/ कावि/287/2019 | 30/12/2019 | 846181 | 5.75 | %कमी | 797526 |
| 18 | मे.विजय इलेक्ट्रीकल्स ॲण्ड जनरेटर्स | 3/8/2019-20 | अ क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र. १४ येथील खंडोबा मंदिर ,मोहननगर, काळभोरनगर, रामनगर व इतर परिसरातील कार्यक्रमाकरिता तात्पुरती ध्वनिविक्षेपण , प्रकाश व्यवस्था, जनित्रसंच , सी.सी.टीव्ही व अन्य विद्युत विषयक कामे करणे. ((सन २०१९-२०) करीता) | 24/12/2019 | अक्षेका/ नि-7/ कावि/286/2019 | 30/12/2019 | 845596 | 5.75 | %कमी | 796974 |
| 19 | मे.ओम रेणुका एंटरप्रायझेस | 1/2/2019-20 | अ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र. १० मधील विविध उद्यानामधील विद्युत व्यवस्थेचे देखभाल दुरुस्ती करणे. (सन २०१९-२०) | 07/11/2019 | अक्षेका/ नि-7/ कावि/301/2019 | 30/12/2019 | 803537 | 25.07 | %कमी | 602090 |
| 20 | मे.स्वरूप इलेक्ट्रीकल ॲण्ड इंजिनिअरींग | 1/21/2019-20 | अ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र. १९ मधील मनपाच्या विविध इमारतीचे विद्युत विषयक देखभाल दुरुस्ती करणे.(सन २०१९-२०) | 07/11/2019 | अक्षेका/ नि-7/ कावि/268/2019 | 09/12/2019 | 767871 | 14.60 | %कमी | 655762 |
| 21 | मे.स्वरूप इलेक्ट्रीकल ॲण्ड इंजिनिअरींग | 1/4/2019-20 | अ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र.१५ मधील मनपाच्या विविध इमारतीचे विद्युत विषयक देखभाल दुरुस्ती करणे. (२०१९-२०) | 07/11/2019 | अक्षेका/ नि-7/ कावि/267/2019 | 09/12/2019 | 803365 | 14.00 | %कमी | 690894 |